# प्रेसनोट

दिनांक 22/05/2018

## शासनाने प्रतिबंधित केलेला सुगंधित जर्दा व गुटखा एकूण किंमती 10,16,000 रूपयाचा स्थानिक गुन्हे शाखेने पकडला

दिनांक 21.05.2018 रोजी संध्याकाळी सपोनि पी.डी. भारती स्था.गु.शा नांदेड यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, मोहम्मद अहेमद अब्दुल वाहेद रा. मनियार गल्ली, इतवारा नांदेड याचे घरामध्ये शासनाने बंदी घातलेला गुटखा व जर्दा याचा मोठया प्रमाणात बेकायदेशीर साठा आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सपोनि पी.डी. भारती व स्टाफने सदर ठिकाणी जावून छापा मारला असता इसम नामे मोहम्मद अहेमद अब्दुल वाहेद वय 32 वर्ष व्यवसाय किराणा व्यापार रा. मनियार गल्ली इतवारा नांदेड याच्या घरामध्ये शासनाने बंदी घातलेला सुगंधीत यूके जर्दाचे 38 बॉक्स एकूण किंमती 7,60,000 रूपयाचे व आदत गुटखाचे 10 मोठे बोरे व एक बॅग एकूण किंमती 2,56,000 रूपयाचे असा एकूण 10,16,000 रूपयाचा माल मिळून आला आहे. सदरचा माल पंचांसमक्ष जप्त करून पुढील कायदेशीर कार्यवाहीस्तव पो.स्टे. इतवारा नांदेड यांच्या ताब्यात दिला आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री चंद्रकिशोर मीणा, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री मंगेश शिंदे, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र सहाणे स्था.गु.शा नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि पी.डी. भारती, पोना/2124 कागणे, पोना/2458, राजू पांगरेकर, पोकॉ/712 शेख जावेद, पोकॉ/337 हिफजूर रेहमान, पोकॉ/महेश बडगु व चालक पोना/2145 दादाराव श्रीरामे यांनी पार पाडली आहे.

पोलीस अधिक्षक
नांदेड करिता